Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

# MPSC
# ASO
## Previous Year Paper
### Paper-I 10 Dec, 2022

Teachingninja.in

सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२२

**2022** परीक्षा दि: १० डिसेंबर, २०२२ **O16**

# A

→ संच क्रमांक

प्रश्नपुस्तिका क्रमांक **BOOKLET NO.** 100581

## प्रश्नपुस्तिका

## पेपर I

## मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, शासकीय योजना व शासनाशी संबंधित बाबी

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा–क्रमांक | | | | | | | | |

केंद्राची संकेताक्षरे ↑     ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

Teachingninja.in

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

Teachingninja.in

1. खालावली, मागासली, झेपावली यासारखी क्रियापदे ही कोणत्या प्रकारातील आहेत?

(1) सिद्‌ध क्रियापद (2) साधित क्रियापद (3) शक्य क्रियापद (4) प्रयोजक क्रियापद

2. मराठीतील ङ, ञ, ण्, न्, म्, या व्यंजनांना कोणत्या नावाने ओळखले जाते?

(अ) स्वरादी (ब) पर-सवर्ण (क) अनुनासिके (ड) ओष्ठ्य

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) (ब), (क) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) (क) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) (अ), (ड) फक्त बरोबर बाकी सर्व चूक

3. घेईघेई माझे वाचे
गोड नाम विठोबाचे

अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा.

(1) देशी (2) अंशाभ्यस्त (3) पूर्णाभ्यस्त (4) पुनरुक्त

4. गाई पाण्यावर काय म्हणुनि आल्या?
का गं गंगायमुनाही या मिळाल्या?

प्रस्तुत काव्यओवीतून कोणता अर्थ प्रकट होतो?

(अ) वाच्यार्थ (ब) लक्षणार्थ (क) व्यंगार्थ (ड) परमार्थ

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (ड) बरोबर
(2) फक्त (क) बरोबर
(3) फक्त (ब) बरोबर
(4) वरीलपैकी सर्व पर्याय योग्य आहेत

5. 'इन मिन साडे तीन' या म्हणीचा योग्य अर्थ कोणता?

(1) गोळाबेरीज करून राहिलेली संख्या
(2) सर्वात अधिक संख्या
(3) अगदी कमीतकमी संख्या
(4) सर्वांमध्ये मिसळून होणारी संख्या



Teachingninja.in

6. 'माणुसकी, चुगलखोर, शहाणपणा' या शब्दातील प्रत्यय प्रकार ओळखा.

(1) साधक प्रत्यय (2) विकारी प्रत्यय

(3) साधक प्रत्यय आणि विकारी प्रत्यय (4) यापैकी कोणतेच नाही

---

7. 'मुलांनो, सर्वजण रांगेत उभे राहा'. हे वाक्य कोणत्या 'अर्था' चे आहे?

(1) स्वार्थ (2) विध्यर्थ (3) आज्ञार्थ (4) संकेतार्थ

---

8. 'सत्यार्थप्रकाश' या शब्दामध्ये संधी झालेले अनुक्रमे मूलध्वनी, स्वर, व्यंजन किती आहेत?

(1) पंधरा, सहा, नऊ (2) चौदा, सहा, आठ

(3) सोळा, सात, नऊ (4) चौदा, आठ, सहा

---

9. वाक्यातील नाम किंवा सर्वनाम यांचे क्रियापदाशी जे संबंध असतात त्यांना काय म्हणतात?

(1) वाक्यार्थ (2) कारकार्थ (3) भावार्थ (4) प्रयोग

---

10. "विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरूवात झाली."

या वाक्याच्या संदर्भात पुढील विधाने लक्षात घ्या व योग्य पर्याय निवडा.

(अ) 'आणि' ह्या स्वरुपबोधक उभयान्वयी अव्ययाने दोन्ही वाक्य जोडली आहेत.

(ब) 'आणि' ह्या समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययानी जोडलेली वाक्य नेहमी संयुक्त वाक्य असतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) पर्याय (अ) आणि (ब) दोन्ही बरोबर (2) पर्याय (अ) बरोबर (ब) चूक

(3) पर्याय (अ) चूक (ब) बरोबर (4) पर्याय (अ) आणि (ब) दोन्ही चूक

---

11. "जे दुःखात आहेत ते रडतात व सध्या जे सुखात आहेत ते आनंद साजरा करतात." या अर्थाची म्हण कोणती ते सांगा.

(1) रोज मरे त्याला कोण रडे (2) जात्यातले रडतात आणि सुपातले हसतात

(3) सुख पाहता जवापाडे दुःख पर्वताएवढे (4) आयत्या बिळात नागोबा

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

12. योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | कठोर व्यंजने | (i) | क, ख, च, छ |
| (ब) | मृदू व्यंजने | (ii) | य्, र्, ल्, व् |
| (क) | अर्धस्वर | (iii) | ग्, घ्, ज्, झ् |
| (ड) | घर्षक/उष्मे | (iv) | श, ष, स |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (4) | (iii) | (iv) | (ii) | (i) |

13. 'दुसऱ्याने आपल्या विरोधात तक्रार करण्यापूर्वी आपणच त्या विरोधात तक्रार करावी.' या अर्थाची म्हण कोणती ते सांगा.

(1) अडला कोल्हा मंगल गाय
(2) अहेर नारळाचा आणि गजर वाजंत्र्यांचा
(3) अस्वलाआधी आरोळी
(4) अटक्याचा सौदा येरझारा चौदा

14. 'शिकेकाई' हा शब्द शब्दसिद्धीच्या कोणत्या प्रकारात येतो?

(1) तत्सम शब्द
(2) तद्भव शब्द
(3) स्वदेशी (परप्रांतीय भाषा शब्द)
(4) विदेशी शब्द (परदेशी शब्द)

15. पुढीलपैकी कोणता शब्द लेखनदृष्ट्या अचूक आहे?

(1) परिशिष्ठ
(2) परिशिष्ट
(3) परीशिष्ठ
(4) परिशीष्ट

16. 'जो वेगाने धावेल तोच सर्वात आधी पोहोचेल.' या वाक्यातील 'गौणवाक्य' कोणते?

(1) जो वेगाने धावेल
(2) धावेल तोच पोहोचेल
(3) वेगाने धावेल तोच...
(4) तोच सर्वात आधी पोहोचेल



Teachingninja.in

17. समानार्थी शब्दाच्या जोड्या जुळवा.

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (अ) निष्कलंक | (i) | प्रांजल |
| (ब) निष्कांचन | (ii) | पवित्र |
| (क) निष्कारण | (iii) | निर्धन |
| (ड) निष्कपट | (iv) | अकारण |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (3) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (4) | (iii) | (i) | (ii) | (iv) |

---

18. वाक्यविचारात विभक्तींचे किती अर्थ सांगितले आहेत?

(1) तीन (2) चार (3) पाच (4) दोन

---

19. योग्य जोड्या लावा.

| गट 'अ' स्वदेश भाषा | | गट 'ब' स्वदेशी शब्द |
|---|---|---|
| (अ) हिंदी | (i) | गुढी |
| (ब) तेलगू | (ii) | गदारोळ |
| (क) कानडी | (iii) | दाम |
| (ड) तामिळी | (iv) | सार |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (2) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (3) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

---

20. धान्यधुन्य, कापडचोपड, चांदणेबिंदणे हे कोणत्या प्रकारचे अभ्यस्त शब्द आहेत?

(1) पूर्णाभ्यस्त शब्द (2) अंशाभ्यस्त शब्द

(3) पूर्णाभ्यस्त व अंशाभ्यस्त शब्द (4) वरीलपैकी एकही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

teachingninja.in
Teachingninja.in

**खालील उतारा वाचा व त्यावरील प्रश्न क्र. 21 ते 25 सोडवा.**

मानवी विकासाचा मार्ग श्रद्धा आणि तर्क यांच्या संघर्षातून जाणारा आहे. बुद्धी आणि मन, आणि प्रचार, नवता आणि परंपरा यांच्यातील लढ्यातूनच एकविसावे शतक उगवले व आजच्या विकसित अवस्थेपर्यंत येऊन पोहोचले आहे. परंपरा व श्रद्धा स्थितिवादी तर विचार व तर्क गतिवादी असतात. स्थितिवाद समाजाला एका जागी दीर्घकाळपर्यंत रोखून धरणारा असतो तर विचार ती बंदिस्त स्थिती मोडून काढणारा असतो.

हा संघर्ष कायम चालणारा व समाजाला अखंडपणे अस्वस्थ करत राहणारा आहे. एक गोष्ट मात्र महत्वाची आणि खरी. या संघर्षात उशिरा का होईना पण विचारच आजवर विजयी होत आला आहे. समाजाच्या विकासाची तऱ्हाच अशी की तो प्रथम स्थितीबाहेर एक नवे व स्वतंत्र पाऊल टाकतो. त्याभोवती संरक्षक व्यवस्था उभी होण्याची काही काळ वाट पाहतो. यथावकाश कधी शांतपणे तर कधी लढाऊपणे तो स्थितीबाहेर येऊन पुढे जातो. दरवेळी त्याचे पाऊल असे पुढे गेलेलेच इतिहासाने पाहिले आहे.

कधीतरी परंपरा वरचढ होते आणि ती त्याला अडवण्याचा प्रयत्न करते. ग्रीकांची अशी अडवणूक प्रथम रोमनांनी व नंतर ख्रिश्चन धर्माने, अरबांची इस्लामने तर भारताची वैदिक धर्माच्या परंपरांनी केली. या अडवणुकीतून प्रथम युरोप, नंतर भारत व चीन बाहेर पडले. अरब जगत या पुढाकारात अजून बरोबरीने सहभागी झाले नाही. स्थितिवादाच्या बाजूने धर्मसत्ता, आपल्या आयुधांनिशी उतरते तर परिवर्तनाची बाजू ज्ञान, विज्ञान, विचार व तर्क लढवत असते.

जगातले सारे समाज सारखेच नाहीत. त्यांची स्थिती वा गतीही सारखी नाही. त्यामुळे येणारे परिवर्तन समाजपरत्वे वेगळे असते. काही समाज लवकर प्रगती पावतात तर काहींचा स्थितिवाद दीर्घकाळ टिकतो. जिथे श्रद्धा बळकट तिथे ही गती कमजोर तर जिथे विचार सामर्थ्यशाली असतो तिथे तीही बलशाली असते. मात्र, दोन्ही जागी संघर्ष अटळ आहेत.

समाजाच्या प्रत्येक अवस्थेत काही ताकदवान वर्गांचे हितसंबंध दडलेले असतात. येणारे परिवर्तन त्यांच्या हितसंबंधांना बाधा आणत असते. मग ते वर्ग या परिवर्तनाला साऱ्या शक्तीनिशी विरोध करतात. परिवर्तनाच्या शक्ती त्या तुलनेत दुबळ्या असतात. शिवाय त्या बहुधा संघटितही नसतात. कारण परिवर्तनाची कळ अनेकदा एकेकट्या संशोधकाच्या, विज्ञानवाद्याच्या वा समाजाच्या पुरोगामी नेत्याच्या हाती असते. त्यांच्या मागे समाजाचा लहानसाच भाग असतो आणि धर्मसत्तेसह साऱ्या सत्ता त्यांना प्रतिकूल असतात. परिवर्तनाची लढाई त्यामुळेच दीर्घकाळ चालणारी व मंद गतीने पुढे जाणारी असते. मात्र, तिची दिशा विजयाचीच असते.

युरोपात ही लढाई विज्ञानाने लवकर, 15 व्या शतकाच्या अखेरीस जिंकली व आपली वाटचाल गतिमान केली. आपण मात्र मागे राहिलो. चीनमध्ये व रशियात धर्म व धर्माच्या श्रद्धा-दोन्ही मार्क्सवाद्यांनी मोडून काढले. भारतात हे युद्ध संपले नाही. प्रसंगी धर्माचे संतही सुधारणांच्या बाजूचे झाले. पण, श्रद्धांची बळकटी कायम राहिली. आताचे राजकारण पुन्हा धर्मांची मंदिरे बांधण्याच्या मागे लागले असल्याने येथील विज्ञान बरेचसे पुस्तकात व काहीसेच जीवनात राहील अशीच शक्यता मोठी आहे.

---

**21.** विज्ञान बरेचसे पुस्तकात व काहीसेच जीवनात राहील अशीच शक्यता मोठी आहे, असे लेखकाला का वाटते ?

(1) जगातले सारे समाज सारखे नाहीत.

(2) समाजाच्या प्रत्येक अवस्थेत काही ताकदवान वर्गाचे हितसंबंध दडलेले असल्याने.

(3) परिवर्तनाची लढाई दीर्घकाळ चालत असल्याने.

(4) आताचे राजकारण पुन्हा धर्माची मंदिरे बांधण्याच्या मागे लागले असल्याने.

---



Teachingninja.in

22. कोणत्या लढ्यातून एकविसावे शतक उगवले?

(अ) बुद्धी आणि मन (ब) नवता आणि परंपरा

(क) धर्म आणि श्रद्धा (ड) विचार व तर्क

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) आणि (क) बरोबर (2) फक्त (अ) आणि (ब) बरोबर

(3) फक्त (क) आणि (ड) बरोबर (4) फक्त (ब) आणि (क) बरोबर

---

23. स्थितिवादाच्या संदर्भात खालीलपैकी कोणता पर्याय अचूक आहे ते सांगा.

(अ) परंपरा व श्रद्धा ह्या स्थितिवादी असतात.

(ब) स्थितिवादाच्या बाजूने धर्मसत्ता, आपल्या आयुधांनिशी उतरते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर (2) फक्त (ब) बरोबर

(3) (अ) आणि (ब) दोन्ही बरोबर (4) (अ) आणि (ब) दोन्ही चूक

---

24. प्रस्तुत उताऱ्यास कोणते शीर्षक योग्य ठरेल?

(1) विज्ञान आणि मानवी विकास (2) धर्म आणि श्रद्धा

(3) नवता आणि परंपरा (4) स्थिती आणि गती

---

25. खालील विधाने लक्षात घ्या व योग्य पर्याय निवडा.

(अ) ग्रीकांची अडवणूक प्रथम ख्रिश्चनांनी व नंतर रोमनांनी केली.

(ब) चीनमध्ये व रशियात धर्म व धर्माच्या श्रद्धा दोन्ही मार्क्सवाद्यांनी मोडून काढली.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) चूक (ब) बरोबर (2) फक्त (ब) चूक (अ) बरोबर

(3) दोन्ही विधाने चुकीची आहेत (4) दोन्ही विधाने बरोबर आहेत

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

26. Which one of the following is a **correct** option in case of the following word formation : "Subterfuge"

(1) 'Fuge' is a suffix
(2) 'Subter' is a prefix
(3) 'Subterfuge' is a verb
(4) 'Subterfuge' is an adjective

---

27. Point out the **incorrect** statements :

(a) She made a good speech in the facilitation ceremony.

(b) Please, do not be under the illusion that all life is pleasure.

(c) The shedding of leaves, on the part of plants which grow in the dry and arid area, is a mode of adoption.

(d) One must march on towards one's goal in the 'ascending' order.

**Answer Options :**

(1) (a), (b) and (c)
(2) (a), (c) and (d)
(3) (b), (c) and (d)
(4) (b) only

---

28. Point out the sentences which are without any prefix or suffix :

(a) Man would live in a cave in the prehistoric age.
(b) You should not build the marble house on the bank of a river.
(c) I dislike travelling in an overcrowded bus.
(d) It is very difficult for an honest man to live in this world.

**Answer Options :**

(1) (a) and (b)
(2) (b) and (d)
(3) (a) and (c)
(4) (a), (b) and (d)

---

29. Choose the best option to fill in the blanks with the same word.

(a) Her poetry has a great deal of political ____________.
(b) He had to be ____________ with third place.

**Answer Options :**

(1) Contend
(2) Contain
(3) Contents
(4) Content

---

30. Identify the adjective clause in the given sentence :

" The umbrella which has a broken handle is mine."

(1) which has
(2) broken handle
(3) which has a broken handle
(4) mine

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**31.** Fill in the two blanks in the following sentence.

Are ______ ______ roses in the garden ?

(1) there, much (2) those, much (3) there, any (4) this, any

---

**32.** (a) This passenger train is about to leave the station.

(b) This passenger train is on the point of leaving the station.

(c) This passenger train is going to leave the station.

(d) This passenger train might leave the station soon.

All the above sentences express the action in the .........

**Answer Options :**

(1) Simple present tense (2) Continuous present tense

(3) Perfect future tense (4) Simple future tense

---

**33.** Choose the best option to fill in the blanks :

(a) ________ his Aunt he has six other female relations.

(b) I do like to be ________ the sea - side.

**Answer options :**

(1) Beside, besides (2) Beside, beside

(3) Beside of, besides (4) Besides, beside

---

**34.** My father was a very good soldier in the Indian Army .

The underlined part of this sentence is a .......

(1) Verb phrase (2) Noun phrase

(3) Adjective phrase (4) Prepositional phrase

---

**35.** A Lenchman is a ______.

(1) Faithful supporter (2) Strong enemy

(3) Honest man (4) Timid man

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

36. Which of the following sentence/sentences is/are **correct** ?

(a) Going up the hill, an old temple was seen.

(b) Entering the room, I found the light quite dazzling.

(c) Standing at the gate, a scorpion stung him.

**Answer Options :**

(1) Only (c) (2) Only (a) (3) Only (b) (4) All (a), (b) and (c)

37. What type of pronoun is the underlined word used in the given sentence :

"You will hurt yourself".

(1) It is Demonstrative Pronoun (2) It is Emphatic Pronoun

(3) It is Reflexive Pronoun (4) It is Distributive Pronoun

38. Point out the sentence that have antonyms :

(a) Early or late, one has to meet one's death.

(b) A wise man knows that he is no better than a fool.

(c) They were drenched in the rain from top to bottom.

(d) A saint has his past, and a sinner, his future.

**Answer Options :**

(1) (a), (b) and (c) (2) (b), (c) and (d) (3) None of these (4) All of these

39. The word 'Vivo' has a Latin root. The meaning of word 'Vivo' is :

(1) the best / fine (2) Calm / quiet (3) Live / vivid (4) Long / strong

40. Choose **correct** sentence/s according to use/absence of article.

(a) I was tired of life.

(b) The both the anxious parents sat up half the night.

(c) This photograph is the best of the two.

**Answer Options :**

(1) (a) and (b) only (2) (b) and (c) only

(3) (a) only (4) (a), (b) and (c)



Teachingninja.in

41. (a) No pain, no gain. (b) Love is blind.
(c) Silence is golden. (d) Pride comes before a fall.

The above statements are the examples of .........

**Answer Options :**

(1) Clauses (2) Phrases
(3) Sayings and proverbs (4) Adjectives

---

42. Point out the sentence that has the 'preposition of time'.

(1) Due to corona - pandemic life everywhere is constrained so we do not know where it is leading us to .
(2) I have not seen my younger brother for months.
(3) Being in a hurry, I could not notice you crossing the road.
(4) Yesterday I attended a lecture on - Sri Aurobindo.

---

43. Choose the **correct** sentences :

(a) Balraj's mother always serves an excellent dinner.
(b) Do you go often fishing ?
(c) He is grumbling always about his ill - luck.

**Answer Options :**

(1) (a) and (b) only (2) (a) only
(3) (a) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

44. Choose the word that means an extreme fear of being in a small confined place :

(1) Homicide (2) Xenophobia (3) Claustrophobia (4) Hydrophobia

---

45. Fill in the blanks.

(a) The noise __________ us from all sides.
(b) The case __________ the court next week.
(c) She __________ the house.

**Answer Options :**

(1) Came at, comes before, came by at (2) Came at, comes before, came by
(3) Comes before, came by, came at (4) Came by, comes before, came at

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**Read the following passage carefully and answer the questions given below it (46-50) :**

The place was full of foot and mounted police, as well as the military. The crowd of sympathetic onlookers swelled up, and many of these persons managed to spread out in twos and threes in the open space. Suddenly we saw in the far distance a moving mass. They were two or three long lines of cavalry or mounted police, covering the entire area, galloping down towards us, and striking and riding down the numerous stragglers that dotted the maidan. That charge of galloping horsemen was a fine sight, but for the tragedies that were being enacted on the way, as harmless and very much surprised sightseers went under the horses' hoofs.

Behind the charging lines these people lay on the ground, some still unable to move, others writhing in pain, and the whole appearance of that maidan was that of a battlefield. But we did not have much time for gazing on that scene or for reflections; the horsemen were soon upon us, and their frontline clashed almost at a gallop with the massed ranks of our processionists. We held our ground, and, as we appeared to be unyielding, the horses had to pull up at the last moment and reared up on their hind legs with their front hoofs quivering in the air over our heads.

And then began a beating of us, and battering with lathis and long batons both by the mounted and the foot police. It was a tremendous hammering, and the clearness of vision that I had had the evening before left me. All I knew was that I had to stay where I was, and must not yield or go back. I felt half-blinded with the blows, and sometimes a dull anger seized me and a desire to hit out.

I thought how easy it would be to pull down the police officer in front of me from his horse and to mount up myself, but long training and discipline held and I did not raise a hand, except to protect my face from a blow.

---

**46.** This passage is about ...........

(a) The tyrants who maltreated and tortured all the processionists.

(b) The demonstration of the cavalry, police and military men.

(c) The pleasurable sightseeing on the part of the onlookers.

(d) The passive resistance on the part of the processionists.

**Answers Options :**

(1) (a) and (c) (2) (b) and (d) (3) (b) and (c) (4) (a) and (d)

---

**47.** Point out the **incorrect** statements :

(1) Suddenly some lines of cavalry and police galloped down towards the processionists.

(2) Many persons lay on the ground, writhing in pain, being unable to move and stand.

(3) The writer was seized by fright so he yielded and went back.

(4) Long training and discipline did not allow him to raise a hand against the oppressors.

---



Teachingninja.in

48. Point out the **correct** answer.

The open space and the maidan was full of ......

(1) the sightseers.

(2) the sympathetic onlookers.

(3) the processionists.

(4) the processionists, the sightseers and the sympathetic onlooker.

---

49. Point out the **incorrect** statements :

(1) The processionists had much time to see the scene and to think over the situation.

(2) The galloping horsemen crushed many people under the hoofs.

(3) The police began beating with long batons and lathis.

(4) The processionists did not yield to the horsemen.

---

50. Point out the **incorrect** statement.

(a) Some police came on foot.

(b) Some police came mounted on the horse - back.

(c) There were many military men.

(d) The whole scene looked like a battlefield.

**Answer Options :**

(1) (a), (b) and (c) (2) (b), (c) and (d) (3) None of these (4) All of these

---

51. महाराष्ट्र राज्य कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART) कोणत्या प्रशासकीय विभागांमार्फत राबविण्यात येतो ?

(1) कृषी, पदुम विभाग, ग्राम विकास विभाग व आदिवासी विभाग

(2) कृषी, पदुम विभाग, ग्राम विकास विभाग व उद्योग ऊर्जा विभाग

(3) कृषी, पदुम विभाग, ग्राम विकास विभाग, सहकार व पणन विभाग

(4) यापैकी नाही

---

52. मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमाकरिता फेलोंची संख्या 20 निश्चित करण्यात आली असून, फेलोंच्या संख्येच्या ______ संख्या महिला फेलोंची असणार आहे.

(1) 1/5 (2) 1/4 (3) 1/3 (4) 1/2

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

53. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण 2021 च्या मुख्य उद्दिष्टान्वये सन 2025 पर्यंत नवीन वाहन नोंदणीत _______ हिस्सा बॅटरी इलेक्ट्रिक वाहनांचा असेल.

(1) 15 टक्के (2) 10 टक्के (3) 5 टक्के (4) 20 टक्के

---

54. अपंग-अव्यंग व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याच्या योजनेंतर्गत अर्जदाराचे अपंगत्व किमान _______ अथवा त्यापेक्षा जास्त असावे लागते.

(1) 60% (2) 40% (3) 50% (4) 30%

---

55. खेलो इंडीया योजनेनुसार जिल्हा, राज्यस्तर स्पर्धा आयोजनासाठी कोणाच्या अध्यक्षतेखाली नोडल एजन्सी स्थापन करण्यात आली आहे?

(1) प्रधान सचिव (क्रीडा)

(2) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य

(3) सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा

(4) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा

---

56. राज्यात सामूहीक प्रोत्साहन योजना _______ पासून राबविण्यात येत आहे.

(1) 1960 (2) 1964 (3) 1997 (4) 2013

---

57. राज्य ग्राहक संरक्षण नियम अंतर्गत राज्य आयोगाचे मुख्य कार्यालय कोठे आहे?

(1) नागपूर (2) नाशिक (3) मुंबई (4) ठाणे

---

58. महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना 2019 अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेबाबत खालील विधाने विचारात घेऊन उत्तराचा **अचूक** पर्याय निवडा.

(अ) ही योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येते.

(ब) सदर योजनेच्या लाभासाठी वैयक्तिक शेतकरी हा निकष गृहीत धरण्यात येतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर (2) फक्त (ब) बरोबर

(3) (अ) व (ब) बरोबर (4) (अ) व (ब) चूक

---

59. "माझी कन्या भाग्यश्री" सुधारीत योजने अंतर्गत ठेव रक्कम _______ इतकी असते.

(1) 40,000 (2) 21,200 (3) 50,000 (4) 60,000

---



Teachingninja.in

60. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजनेअंतर्गत विविध वाङ्मय प्रकारातील एकूण _______ पुस्तकांची निवड करण्यात येते. या पुरस्काराचे स्वरुप रोख रक्कम (कमीत कमी रु. 50 हजार व जास्तीत जास्त रु. 1 लक्ष) स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे.

(1) 25 (2) 35 (3) 40 (4) 20

61. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राबवावयाच्या कामाचे निर्धारण, परीक्षण व सामाजिक लेखा परीक्षण _______ करते.

(1) ग्रामपंचायत (2) तलाठी कार्यालय (3) ग्रामसभा (4) जिल्हा परिषद

62. अनुसूचित जमातीच्या मुलामुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याच्या योजनेंतर्गत शिष्यवृत्तीकरिता पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा _______ पर्यंत आहे.

(1) 2.00 लक्ष (2) 10.00 लक्ष (3) 4.00 लक्ष (4) 6.00 लक्ष

63. केंद्रवर्ती अर्थसंकल्प ही योजना _______ विभागामार्फत राबविण्यात येते.

(1) वित्त विभाग (2) नियोजन विभाग
(3) आदिवासी विकास विभाग (4) सामान्य प्रशासन विभाग

64. सर्व शिक्षा अभियान कधी सुरू करण्यात आले?

(1) 2002 - 03 (2) 2004 - 05 (3) 2000 - 2001 (4) 2003 - 2004

65. योग्य जोड्या जुळवा. (केंद्रशासनाच्या महिलासाठी योजना)

| गट 'अ' (योजना) | गट 'ब' (उद्दिष्ट) |
|---|---|
| (अ) अल्पमुदती निवासगृहे | (i) आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांचे कौशल्य वाढविणे |
| (ब) स्टेप | (ii) सामाजिक व नैतिकदृष्ट्या संकटात सापडलेल्या महिलांचे पुनर्वसन |
| (क) उज्ज्वला | (iii) कुंटणखान्यातून मुक्त केलेल्या महिलांचे पुनर्वसन |
| (ड) स्वाधार | (iv) महिला व मुलींच्या मानवी वाहतुकीला आळा घालणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

66. महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणारा नव-तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प कोणाच्या सहाय्याने राबविण्यात येतो ?

(1) जागतिक बँक निधी (2) आशियाई बँक निधी

(3) आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (4) युनिसेफ मदत निधी

67. तांडा/वस्ती सुरक्षा योजनेंतर्गत 100 ते 150 लोकसंख्या असलेले तांडे/वस्त्या यांकरिता किती मर्यादेपर्यंत अनुदान वितरीत करण्यात येते ?

(1) रु. 5.00 लाख (2) रु. 10.00 लाख (3) रु. 4.00 लाख (4) रु. 6.00 लाख

68. सुधारीत नवीन मनोधैर्य योजनेबाबत खालील विधाने विचारात घेऊन उत्तराचा **योग्य** पर्याय निवडा :

(अ) सुधारीत नवीन मनोधैर्य योजना महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येते.

(ब) सदर सुधारीत नवीन मनोधैर्य योजनेचे पीडितांच्या अर्थसहाय्याचे मागणी अर्ज स्वीकारण्यापासून मंजूरीचे अधिकार महिला व बाल विकास विभागास आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर (2) फक्त (ब) बरोबर

(3) (अ) व (ब) दोन्ही बरोबर (4) (अ) व (ब) दोन्ही चूक

69. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत अनुसूचित जातीतील लाभार्थ्याला कोणता लाभ दिला जातो ?

(1) घरकूल (2) विहीर (3) गोठा (4) शेळी गट

70. मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेंतर्गत पुढील 3 वर्षाच्या कालावधीत _______ सौर कृषी पंप आस्थापित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

(1) 3 लाख (2) 1 लाख (3) 2 लाख (4) 4 लाख

71. राष्ट्रीय आरोग्य अभियान कधीपासून राबविण्यात येत आहे ?

(1) 10 - 4 - 2006 (2) 10 - 4 - 2005

(3) 12 - 4 - 2006 (4) 12 - 4 - 2005

72. प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत _______ जोखीमस्तर देय आहे.

(1) 50 टक्के (2) 60 टक्के (3) 25 टक्के (4) 70 टक्के



Teachingninja.in

73. नवसंजीवन योजनेचे मुख्य अंमलबजावणी अधिकारी कोण असतात ?

(1) जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी
(2) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी
(3) जिल्हा आरोग्य अधिकारी
(4) जिल्हाधिकारी

---

74. मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेंतर्गत पात्रतेचे निकष काय आहे/आहेत ?

(1) स्थायित्व प्रमाणपत्र
(2) 5 वर्षांची नियमित सेवा
(3) शासकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक रित्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र
(4) वरीलपैकी सर्व

---

75. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) मध्ये केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा किती आहे ?

(1) 50 : 50 (2) 60 : 40 (3) 75 : 25 (4) 90 : 10

---

76. खालीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(अ) अरुणा असफअली यांनी आझाद रेडीओची स्थापना केली.
(ब) रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात भाई कोतवाल यांनी 'आझाद दस्ता' ची स्थापना केली.
(क) नागपूरच्या जनरल आवारी यांच्या लालसेनेने ब्रिटीशांना विरोध केला.
(ड) सातारा जिल्ह्यामध्ये क्रांती सिंह नाना पाटील यांनी मुलांच्या मनावर राष्ट्रभक्तीचा संस्कार करण्यासाठी राष्ट्रसेवा, आझाद सेना आणि तुफान सेना इत्यादी संघटना उभारल्या.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) फक्त (2) (ब), (क) आणि (ड) फक्त
(3) (ब) आणि (क) फक्त (4) (क) आणि (ड) फक्त

---

77. सिराज उद्दौलाने कलकत्ता जिंकून घेतल्यावर त्याचे __________ असे नाव ठेवले.

(1) दौलत नगर (2) अलीनगर (3) सेरामपूर (4) वरीलपैकी नाही

---

78. सर स्टॅन्ले रीड हे एकेकाळी __________ वृत्तपत्राचे संपादक होते.

(1) टाईम्स ऑफ इंडिया (2) टाईम्स ऑफ महाराष्ट्र
(3) टाईम्स ऑफ बॉम्बे (4) टाईम्स ऑफ मद्रास

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

79. योग्य जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | श्री.अ. डांगे | (i) | रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टी |
| (ब) | मानवेंद्रनाथ रॉय | (ii) | रेव्होल्यूशनरी कम्यूनिस्ट पार्टी |
| (क) | सौमेन्द्रनाथ टागोर | (iii) | 'गांधी विरुद्ध लेनिन' चे लेखक |
| (ड) | सुभाषचन्द्र बोस | (iv) | फॉरवर्ड ब्लॉक |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

---

80. 1857 च्या उठावा संदर्भातील पुढीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत?

(अ) 1857 साली खानदेशात कजारसिंग यांच्या नेतृत्वाखाली उठाव झाला.

(ब) रघु भांगडिया यांच्या नेतृत्वात नागपूर भागात उठाव झाला.

(क) खानदेशातील आदिवासी 400 भिल्ल स्त्रिया सहभागी झाल्या होत्या.

(ड) सातपुडा भागात शंकरशाहाच्या नेतृत्वाखाली उठाव करण्यात आला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (ब) फक्त
(2) (ब) आणि (क) फक्त
(3) (अ), (क) आणि (ड) फक्त
(4) (क) आणि (ड) फक्त

---

81. हे सह्याद्री पर्वताशी संबंधित **नाही.**

(अ) चिखलदरा थंड हवेचे ठिकाण
(ब) सातमाळा डोंगर
(क) वैतरणा नदी
(ड) कळसुबाई उंच शिखर

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ)
(2) (अ) आणि (ब)
(3) (ब) आणि (क)
(4) फक्त (ड)

---

82. महाराष्ट्र राज्याच्या पश्चिमेस असलेल्या अरबी समुद्राचे क्षेत्रफळ __________ एवढे आहे.

(1) 88,680 चौ.कि.मी.
(2) 38,62,000 चौ.कि.मी.
(3) 21,73,000 चौ.कि.मी.
(4) 1,020 चौ.कि.मी.

---

83. जनगणना 2011 प्रमाणे खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या 15 लाखांच्या वर आहे?

(अ) चंद्रपूर
(ब) बुलढाणा
(क) जालना
(ड) परभणी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (क), (ड)
(2) (अ), (क)
(3) (ब), (क), (ड)
(4) (अ), (ब), (क), (ड)

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

84. उत्कृष्ट शेती कार्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार 2006, कोणास दिला गेला?

(1) डॉ. नारायण कृष्णराव सावंत
(2) श्री. सोपान सखाराम कांचन
(3) श्री. पोपटराव भागुजी पवार
(4) श्री. दादाजी रामजी खोब्रागडे

85. जोड्या जुळवा :

| | धरण/प्रकल्प | | जिल्हा |
|---|---|---|---|
| (अ) | वाघूर | (i) | नाशिक |
| (ब) | भाम | (ii) | बुलढाणा |
| (क) | पेनटाकळी | (iii) | जळगाव |
| (ड) | अरुणावती | (iv) | यवतमाळ |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (2) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (iv) | (ii) | (iii) | (i) |

86. ग्रामसभेबाबत खालीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत?

(अ) ग्रामसभेला राज्यशासनाच्या बरोबर केन्द्र शासनाच्याही योजनेसाठी वैयक्तिक लाभार्थी निवडीचा अधिकार आहे.
(ब) अनुसूचित क्षेत्रातील तसेच अन्य (बिगर अनुसूचित) क्षेत्रातील ग्रामपंचायतींना समान अधिकार देण्यात आलेले आहेत.
(क) ग्रामसभेची नोटीस सभेपूर्वी 10 दिवस अगोदर व विशेष ग्रामसभेसाठी किमान 5 दिवस अगोदर काढावी लागते.
(ड) ग्रामसभेला किमान उपस्थिती 100 किंवा एकूण मतदारांच्या 15% यापैकी जी कमी असेल इतकी उपस्थिती गणपूर्तीसाठी आवश्यक आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (ड)
(2) (ब), (क) आणि (ड)
(3) (अ), (ब) आणि (क)
(4) (अ) आणि (ड)

87. भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेबाबत खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे?

(1) केशवानंद भारती खटल्यामध्ये (1973) सर्वोच्च न्यायालयाने उद्देशपत्रिका हा राज्यघटनेचा भाग नाही असे म्हटले आहे.
(2) उद्देशपत्रिका हा कायदेमंडळाच्या अधिकाराचा स्त्रोतही नाही आणि त्याच्या अधिकारांवर बंधनेही घालत नाही.
(3) 'उद्देशपत्रिका ही आपल्या सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताकाची कुंडली आहे' या शब्दात के.एम्. मुन्शी यांनी उद्देशपत्रिकेचे महत्व प्रतिपादन केले आहे.
(4) वरीलपैकी एकही नाही

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in

88. राज्याचा महाधिवक्ता (Advocate General of the State) यांचा कार्यकाळ किती असतो ?

(1) पाच वर्षाचा (2) राज्यपालांची मर्जी असे पर्यंत

(3) राष्ट्रपतींची मर्जी असे पर्यंत (4) सहा वर्षाचा

---

89. खालीलपैकी कोणते विधान जिल्हापरिषदेच्या संदर्भात **चुकीचे** आहे ?

(1) जिल्हापरिषदेचे अध्यक्ष आपला राजीनामा जिल्हाधिकाऱ्यांकडे देतात.

(2) जिल्हा परिषदेत महिलांसाठी 50% जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

(3) पंचायत समितीचे सभापती हे जिल्हापरिषदेचे पदसिद्ध सभासद असतात मात्र त्यांना मतदानात भाग घेता येत नाही.

(4) जिल्हा परिषदेच्या पहिल्या बैठकीत अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड केली जाते. ही बैठक जिल्हाधिकारी बोलावतात.

---

90. बलवंतराय मेहता समितीची स्थापना ___________ मध्ये करण्यात आली.

(1) जानेवारी 1957 (2) ऑक्टोबर 1952 (3) ऑक्टोबर 1953 (4) नोव्हेंबर 1957

---

91. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मध्ये अंतर्भूत असलेल्या 'अनुसूची' ची संख्या किती आहे ?

(1) चार (2) दोन (3) तीन (4) पाच

---

92. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील तरतुदींनुसार जोड्या लावा :

| | कलम | | तरतूद |
|---|---|---|---|
| (अ) | कलम 6 | (i) | माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद |
| (ब) | कलम 7 | (ii) | माहितीच्या विनंतीचा अर्ज निकाली काढणे |
| (क) | कलम 8 | (iii) | माहिती मिळविण्याकरिता विनंती करणे |
| (ड) | कलम 10 | (iv) | माहितीची पृथक्करणीयता |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (2) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (iii) | (ii) | (i) | (iv) |

---



Teachingninja.in

**93.** माहितीचा अधिकार अधिनियमान्वये __________ व्यक्तिकडून कोणतेही शुल्क आकारले जाऊ शकत नाही.

(1) सरकारी नोकर असणाऱ्या (2) विदेशी

(3) संसद सदस्य असणाऱ्या (4) वरीलपैकी काहीही नाही

---

**94.** संविधानाच्या अनुच्छेद 239 अन्वये नियुक्त करण्यात आलेला __________ हा माहिती अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 2 (e) (v) नुसार "सक्षम प्राधिकारी" असतो.

(1) प्रशिक्षक (2) आचार्य (3) प्राचार्य (4) प्रशासक

---

**95.** माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) च्या तरतुदींच्या अधीन राहून, पुढील व्यक्तिंकडून तक्रार स्वीकारणे व त्याची चौकशी करणे, यथास्थिती केंद्रीय माहिती आयोग यांचे कर्तव्य असेल. याबाबत खालीलपैकी कोणते/ती विधान/ने **योग्य** आहे/आहेत?

(अ) या अधिनियमान्वये मागणी करण्यात आलेली कोणतीही माहिती मिळण्यास नकार मिळालेली व्यक्ती.

(ब) या अधिनियमान्वये माहितीसाठी किंवा माहिती मिळवण्यासाठी केलेल्या मागणीस विनिर्दिष्ट मुदतीत प्रतिसाद मिळालेली व्यक्ती.

(क) अवाजवी वाटत असलेली फी भरण्यात जिला भाग पाडण्यात आले अशी व्यक्ती.

(ड) या अधिनियमान्वये अभिलेख मिळवता येण्याच्या किंवा त्यासाठी विनंती करण्याच्या संबंधातील इतर कोणत्याही बाबीं विषयी तक्रार करणारी व्यक्ती.

**योग्य** पर्याय निवडा :

(1) विधान (अ), (ब) आणि (क) योग्य आहेत.

(2) विधान (ब), (क) आणि (ड) योग्य आहेत.

(3) विधान (अ), (क) आणि (ड) योग्य आहेत.

(4) वरील सर्व विधाने योग्य आहेत.

---

**96.** अंगोलाच्या अध्यक्षपदी ऑगस्ट 2022 मध्ये कोणाची फेर निवड झाली?

(1) आंद्रेस म्यॅन्यूएल (2) रिकार्डो वेगास (3) ॲना पॉउला (4) ज्वावो लॉरेन्सो

---

**97.** वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या (सी एस आय आर) पहिल्या महिला प्रमुख म्हणून कोणाची नियुक्ती करण्यात आली?

(1) डॉ. एन. कलैसेल्वी (2) डॉ. मार्गारेट अलवा

(3) डॉ. इंद्रा नूई (4) डॉ. फाल्गुनी नायर

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

98. जून 2021 मध्ये सुरु करण्यात आलेला 'ई-100 पायलट प्रोजेक्ट' कशाशी संबंधित आहे?

(1) विद्युत वाहन (2) इथेनॉल उत्पादन (3) विमान चालक प्रशिक्षण (4) विद्युत रेल्वे प्रकल्प

---

99. ऑलिम्पिकच्या (ऑगस्ट 2021) ॲथेलेटिक्समध्ये भालाफेक स्पर्धेत नीरज चोप्राने जे सुवर्णपदक मिळविले, ते त्याने __________ यांना समर्पित केले.

(1) मेजर ध्यान चंद (2) मिल्खासिंग

(3) खाशाबा जाधव (4) वरीलपैकी एकही नाही

---

100. क्रीडा क्षेत्रात दिला जाणारा सर्वोच्च राजीव गांधी खेल रत्न पुरस्काराला __________ हे नवीन नाव देण्यात आले.

(1) राष्ट्रीय खेल रत्न पुरस्कार (2) देशी खेल रत्न पुरस्कार

(3) मेजर ध्यान चंद खेल रत्न पुरस्कार (4) विजयी खेल रत्न पुरस्कार

---

-o0o-



Teachingninja.in

**सूचना** – (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग–1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर–क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर–क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

SEAL

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in